# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26



मार्गदर्शन करताना डॉ. विकास सलगर, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, डॉ. प्रल्हाद चव्हाण आदी. (आराधना फोटोज पाटण)

# शिक्षक ज्ञानदाता न राहता मार्गदर्शक, प्रेरणादाता घटक बनला पाहिजे : डॉ. विकास सलगर

## कोयना एज्युकेशन सोसायटीचा ५८ वा वर्धापनदिन उत्साहात

पाटण, दि. १२ : आधुनिक युगात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असून शिक्षकाची भूमिका अधिक व्यापक आणि जबाबदारीची बनली आहे. बदलत्या शिक्षणपद्धतीत शिक्षक फक्त ज्ञानदाता न राहता मार्गदर्शक, प्रेरणादाता आणि व्यक्तिमत्त्व घडविणारा घटक बनला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. विकास सलगर यांनी केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, डॉ. प्रल्हाद चव्हाण, पृथ्वीराज पाटील, दादासाहेब जाधव, डॉ. सीमा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. विकास सलगर म्हणाले, पूर्वी पाठांतर आधारित शिक्षणावर भर होता. मात्र आजचा काळ कौशल्याधिष्ठित शिक्षण आहे. विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, सर्जनशीलता, तर्कशक्ती आणि डिजिटल ज्ञान विकसित करणे ही आजच्या शिक्षकाची गरज आहे. इंटरनेट आणि तंत्रज्ञानामुळे ज्ञान मिळविण्याची साधने उपलब्ध झाली असली तरी शिक्षकाचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट त्यांची भूमिका अधिक संवेदनशील व बहुआयामी झाली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी प्रास्ताविकात शिक्षणात जसे बदल होत आहेत ते बदल स्वीकारून पुढे गेले पाहिजे. शहरात मिळणारे दर्जेदार शिक्षण आम्ही तालुक्यातील सर्वसामान्य घरातील मुलांना देण्याचा प्रयत्न करतो आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्राचार्य शमशुद्दिन आतार यांनी शिक्षणातील एआयचा वापर या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. विलास पाटील यांनी शिक्षणातील बदलते स्वरूप व शिक्षकाची भूमिका या विषयावर संवाद साधला. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या सेवकांचा सत्कार आणि वर्षभरात विविध शाखांमध्ये शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक आणि स्पर्धा परीक्षा या क्षेत्रात प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

प्रा. अंजना शेलार व प्रा. पानस्कर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य राजेंद देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमास विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक, शिक्षणप्रेमी उपस्थित होते.